


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २५८ ■ शनिवार, दि. २८ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283/ 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# कोकाटेंचे मंत्रिपद कापण्यासाठी खरातचा तटकरेंना फोन....!

## चाकणकर अन् तटकरेंना सहआरोपी करण्याची मागणी

प्रतिनिधी २८ मार्च

**मुंबई:** राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांना मंत्री करू नये म्हणून भोंदू अशोक खरातने सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंना फोन केला होता, असा मोठा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केला होता. या प्रकरणी त्यांनी कोकाटेंना त्यांच्याकडे असलेली माहिती पुढे आणण्याचेही आवाहन केले आहे. प्रस्तुत प्रकरणात सुनील तटकरेंसह रुपाली चाकणकर यांना सहआरोपी करून त्यांचे व्यवहार तपासले पाहिजेत. कारण अशोक खरात एकटा नसून, त्याची एक मोठी टीम आहे, असेही शरद पवार गटाने म्हटले आहे.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेश प्रवक्ता तथा संघटक सचिव विकास लवांडे या प्रकरणी म्हणाले की, सध्या महाराष्ट्रात गाजत आहे. त्याची नवनवीन प्रकरणे बाहेर येत आहेत. हा लिंगपिसाट भोंदू बाबाने गेल्या काही वर्षांत अनेक महिलांचे शोषण केले. अनेक महिलांचे शारीरिक, मानसिक आर्थिक शोषण केले. या प्रकरणात अनेक मोठे राजकीय व्यक्ती व उद्योजक अडकलेत. ही सर्व काळी कृत्य करणे हे त्याचे एकट्याचे काम नाही.



### खरातांकडे जाणारे 'ते' ४० आमदार कोण

सत्ताधारी आमदार दीपक केसरकर म्हणतात की मला एकट्यालाच का टार्गेट करता आहात, खरातकडे ४० आमदार जात होते, हे ४० आमदार कोण हे पुढे आले पाहिजे, असे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. खरातसाठी विमानांची सोय करणारे सरकारमधील कोण लोकं होते हे जाहीर केले पाहिजे, अशी मागणीही राऊत यांनी केली आहे.

### राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा

भोंदूबाबा अशोक खरातमुळे गोत्यात आलेल्या रूपाली चाकणकरांनी अखेर शुक्रवारी राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. यापूर्वी त्यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावर पाणी सोडावे लागले होते. चाकणकरांविरोधात पक्षात असंतोष वाढीस लागला होता. अखेर शुक्रवारी चाकणकरांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची भेट घेतली. त्यानंतर राजीनामा पक्षाध्यक्षांकडे सुपूर्द केला. खरात प्रकरणाबाबत पहिल्या दिवशीच मी माझी भूमिका स्पष्ट केली

### माणिकराव कोकाटेंचा होता अडथळा

विकास लवांडे पुढे म्हणाले, या सर्व प्रकरणात सिन्नरचे आमदार माणिकरावर कोकाटे खरातच्या मार्गात अडथळा ठरत होते. कोकाटे या खरातकडे गेल्याचे कुठेही फोटो नाहीत, कुठेही चर्चा नाही. याच खरातने राज्यात सरकार स्थापन होत असताना सुनील तटकरेंना फोन करून कोकाटेंना मंत्री करू नये म्हणून फोन केला होता. तटकरेंनी सांगावे की किती वेळा खरातने त्यांना विनवण्या केल्या किंवा फोन केले माणिकरावांना मंत्री करू नये म्हणून. रुपाली चाकणकरांनीही तसा आग्रह धरला होता. पण अजित पवारांनी कोकाटेंना मंत्री केले. आज कोकाटेंनी त्यांच्या मतदारसंघात सिन्नरला एवढे मोठे रॅकेट सुरू असताना आता बोलण्याची आवश्यकता आहे.

### भोंदू बाबा ऋषीकेश वैद्यला अटक

अंगात दैवी शक्तीचा संचार असल्याचा दावा करत एका महिलेवर बलात्कार करणाऱ्या भोंदू ऋषीकेश वैद्य याला पुणे पोलिसांनी पिंपरी येथून अटक केली आहे. एका ३५ वर्षीय पीडित महिलेने या भोंदू बाबा विरोधात फिर्याद दाखल केली होती. त्याने 'मी तुझा शंकर, तू माझी पार्वती' म्हणत महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. पीडित महिला मूळची पुण्यातील आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये तिची समाज माध्यमातून वसई येथील ऋषीकेश वैद्य याच्याशी ओळख झाली होती. पीडित महिला व्रतवैकल्ये करत असल्याने, वैद्यने तिला आपल्या जाळयात ओढले. 'माझ्या अंगात दैवी संचार आहे. ईश्वराची उपासना कशी करायची, याचे तंत्र मी तुला शिकवतो,' असे सांगून त्याने महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर, २०२३ मध्ये आरोपी पुण्यात आला. त्याने मांजरी परिसरात पीडित महिलेची भेट घेतली. तिथे त्याने महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार केला.

## खाकीचं स्वप्न राहिलं अधुरंच !

**पुणे :** पोलिस भरतीसाठी मैदानी चाचणीत धावताना एका २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. आज (ता. २८) सकाळी शिवाजीनगर पोलिस मुख्यालयातील मैदानावर ही घटना घडली. एक हजार ६०० मीटर धावण्याची चाचणी देत असताना अचानक त्याला 'फिट' आली. मैदानात बेशुद्ध होऊन कोसळल्यानंतर त्याला तातडीने रुग्णलयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.

## अश्लील व्हिडिओ व्हायरल केल्याने 65 जणांवर गुन्हा

### डिलिट करा तुमच्याही मोबाईलमधील ते व्हिडिओ

प्रतिनिधी २८ मार्च



**नाशिक:** भोंदू अशोक खरातच्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडून सुरू आहे. या प्रकरणातील पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केल्याप्रकरणी पोलिसांनी ६५ वापरकर्त्यांविरुद्ध सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. सायबर पेट्रोलिंगदरम्यान फेसबुक, इन्स्टाग्राम आणि एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सुमारे ६५ वापरकर्ते पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ, इमेजेस तसेच एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने मॉर्फिंग करून ते प्रसारित करत असल्याचे आढळून आले आहे. याप्रकरणी संबंधित सोशल मीडिया प्रोफाइल धारकांविरुद्ध शहर सायबर पोलिस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियमान्वये गुन्हे दाखल झाले आहेत. पोलिस प्रशासनातर्फे सोशल मीडिया वापरकर्ते नागरिक, न्यूज चॅनल, सोशल मीडिया न्यूज पोर्टल तसेच विविध ऑनलाइन माध्यमांना पीडित महिलेची ओळख, तिच्या नातेवाइकांची माहिती किंवा तिच्या घराची ओळख उघड होईल, असे कोणतेही व्हिडिओ किंवा अश्लील माहिती प्रसरित न करण्याचे, असल्यास ती हटविण्याचे आवाहन करण्यात आले आहे, अशी माहिती अथवा व्हिडिओ प्रसारित करताना आढळल्यास संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात येईल, इतरही कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही पोलिसांकडून या वेळी सांगण्यात आले.

## जीवघेण्या हल्ल्यातील जखमी जवानाचा उपचारादरम्यान मृत्यू

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला :** जुने शहर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या हद्दीत आर्मी जवान सुशील तेलगोटे यांच्यावर त्यांच्याच मित्रांनी त्याच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या जवानाचा अखेर शुक्रवारी रात्री उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार फिर्यादी दिलीप दयाराम तेलगोटे यांनी जुने शहर पोलिस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा आर्मी जवान सुशील तेलगोटे हा सुट्टीवर



आलेला असताना बुधवार रात्री त्यांच्या मित्रासोबत बाहेर गेला होता. यावेळी त्याच्या मित्रांनीच त्याच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी जवानाला तातडीने जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा शुक्रवारी रात्री मृत्यू झाला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तत्काळ कारवाई सुरू करीत जुने शहर पोलिस स्टेशनमध्ये कलम १०९, ३ (५) भारतीय न्याय संहिता अंतर्गत तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी यशवंत उर्फ गोलू गणेश ठाकूर (२७) अकोली, जय विनोद मोरेकर, अकोली आणि बाळा धुमाजी सोलापुरे रा.अकोली या तीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले आहे. या घटनेचा पुढील तपास जुने शहर पोलिस करीत आहेत. या घटनेमागील मुख्य कारण अद्याप समोर आले नसले तरी अंतर्गत वादातून हा जीवघेणा हल्ला झाला असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## रॉकेल वाटप : एक अनार सौ बिमार !

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला :** रेशन दुकानातून रॉकेलच वितरण करण्यात येणार असल्याचे घोषणा काही दिवसांपूर्वीच करण्यात आली. त्यानंतर आता जिल्ह्यासाठी रॉकेलचा साठा मंजूर झाला आणि लवकरच त्याचे रेशन दुकानातून वाटपही होणार आहे. मात्र जिल्ह्यातील लाभार्थी संख्या आणि त्यांच्यासाठी आलेले रॉकेल यांच्या प्रमाणात फार मोठी तफावत असल्याने रॉकेल वाटप करताना रेशनदुकानदारांचा कस लागणार आहे. रॉकेल वाटप म्हणजे 'एक अनार सौ बिमार' अशी स्थिती होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

मध्यपूर्वेतील देशांमध्ये भडकलेल्या युद्धामुळे एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याने केंद्र शासनाने केरोसीन वाटपाचा निर्णय घेतला आहे. मार्च-एप्रिल २०२६ या कालावधीसाठी अकोला जिल्ह्यास ७२ हजार लिटर केरोसीनचा कोटा अन्न नागरी पुरवठा विभागाकडून मंजूर करण्यात आला आहे. जिल्ह्यात ३ लाख २६ हजार कार्डधारक आहेत. प्रतिकार्ड धारकांना ३ लीटरप्रमाणे वाटप होईल. त्यामुळे २४ हजार लाभार्थींना वाटप शक्य आहे. तर उर्वरित ३ लाख २ हजार कार्डधारकांना रॉकेलपासून वंचित राहण्याची पाळी येणार आहे.

राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून नुकताच शासन निर्णय जारी करण्यात आला असून या निर्णयाच्या अधीन राहून जिल्ह्यात केरोसीनचे वितरण होणार आहे. ७२ हजार लिटर साठा हा जिल्ह्यासाठी मंजूर झाला आहे. लवकर याचे वितरणसाठी प्रक्रिया सुरू होणार आहे.

**रवींद्र यन्नावार,**
जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला

### रॉकेल वितरणासाठी काढावी लागेल 'ईश्वरचिठ्ठी'?

जिल्ह्याला मंजूर झालेला रॉकेलचा साठा आणि लाभार्थींची संख्या लक्षात घेता रेशन दुकानदारांना रॉकेलचे वितरण करताना ईश्वरचिठ्ठी किंवा लॉटरी पद्धतीचा अवलंब करावा लागण्याची शक्यता आहे. यामध्ये केवळ ग्रामपंचायतमधील अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंबातील रेशनधारकांचा विचार केला तरी त्यांची संख्या जिल्ह्यात २ लाख ६७ हजार ६४७ एवढी आहे. प्रत्येकांना तीन लीटरप्रमाणे वाटप केले तरी केवळ २४ हजार कार्डधारक नागरिकांनाच वाटप होऊ शकते. त्यामुळे रॉकेल कोणाला द्यावे आणि कोणाला नाही, हे ठरविणे मोठी कसरत राहणार आहे.

## प्रेमसंबंधातून 'त्या'तरुणीचा निर्घृण खून; तेराव्या दिवशी उलगडा

प्रतिनिधी २८ मार्च

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील कळंब पोलीस स्टेशन हद्दीतील तासलोट जंगल शिवारात प्रेमसंबंधातील वादातून एका २६ वर्षीय तरुणीचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपीने तिचा गळा दाबून व चाकूने वार करून हत्या केली. नंतर मृतदेहावर दगडाने हल्ला करून पेट्रोल ओतून जाळण्याचा प्रयत्न केला. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे चेहरा पूर्णपणे विद्रूप झालेल्या कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह १८ दिवसांनंतर सापडला.


पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मृत तरुणीची ओळख राणी किशोर वानखडे (वय २६, रा. चापडोह, ता. यवतमाळ) अशी झाली. मुख्य आरोपी सतीश रमेश कश्यप (वय २०, पाणीपुरी विक्रेता, रा. चापडोह) याला ताब्यात घेण्यात आले आहे. एका विधीसंघर्षग्रस्त बालकानेही आरोपीला मदत केल्याचे तपासात उघड झाले.

१० मार्च २०२६ रोजी सतीशने राणीला पुण्याहून यवतमाळला बोलावले. ११ मार्च रोजी दोघे फिरल्यानंतर सायंकाळी तासलोट जंगलात गेले. तेथे पूर्वनियोजित वादातून सतीशने तिचा खून केला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केला. मृतदेह ओळखणे अत्यंत कठीण होते. ८ विशेष पथकांनी आजूबाजूच्या जिल्ह्यांत, सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल ट्रॅकिंग, मतदार यादी, रेशनकार्ड, लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून सखोल तपास केला.

## 8 बड्या आयएएस अधिकाऱ्यांची बदली

प्रतिनिधी २८ मार्च

**मुंबई :** राज्यात नाशिक येथील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाची चर्चा असून, एसआयटीकडून सखोल चौकशी केली जात आहे. अशातच एक मोठी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्राच्या प्रशासनात मोठा उलटफेर झाला आहे. प्रशासनातील तब्बल ८ आयएएस अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. या बदल्यावरुन अशोक खरात प्रकरणाचे प्रशासनातही पडसाद उमटताना दिसत आहेत. भोंदू खरातशी काही सरकारी अधिकाऱ्यांचेही संबंध असल्याचे तपासात उघड झाले आहे. काही दिवसांपूर्वी खरातशी संबंध असल्याचा ठपका ठेवत उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे पाटील यांची उचलबांगडी करण्यात आली आहे.




## जिल्ह्यात मागणीपेक्षा अधिक पेट्रोल, डीझेलचा साठा

### पुरवठा विभागाची माहिती; नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये !

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला :** जिल्ह्यातील सर्वच पेट्रोलपंपांवर दोन दिवसांपासून रांगाच रांगा पाहायला मिळत आहेत. केवळ अफवांमुळे नागरिक पॅनिक होत असून, गरज नसतानाही पेट्रोल, डिझेलचा साठा करून ठेवत आहेत. वास्तविक पाहता जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलच्या मागणीपेक्षा अधिक साठा उपलब्ध आहे. जिल्ह्याची पेट्रोल, डिझेलची रोजची मागणी २७० केएल एवढी असून, आपल्याकडील उपलब्ध साठा ३४० केएल एवढा आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊन नये व अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी केले आहे.



**जिल्ह्यातील पेट्रोल-डिझेलची मागणी आणि साठा**

| कंपनी | मागणी | उपलब्ध साठा | पेट्रोलपंप |
|---|---|---|---|
| एचपीसीएल | १०० केएल | १२४ केएल | ३२ |
| बीपीसीएल | ९५ केएल | १०७ केएल | ३३ |
| आयपीसीएल | ७५ केएल | १०९ केएल | ४२ |

मध्य पूर्वेतील युद्धाच्या परिणामामुळे जिल्ह्यात पेट्रोल टंचाई जाणवत असल्याच्या अफेमुळे अकोला शहरासह जिल्ह्यातील बहुतांश पेट्रोल पंपांवर नागरिकांच्या रांगा पहायला मिळत आहेत. अकोला जिल्ह्यासह विदर्भातील नऊ जिल्ह्यांना पेट्रोल-डिझेलचा पुरवठा करणाऱ्या गायगाव डेपोमध्ये मोठ्या प्रमाणात पेट्रोल-डिझेलचा साठा उपलब्ध आहे. जिल्ह्याचा विचार केला असता जिल्ह्यातील १०७ पेट्रोल पंपांची मागणी २७० केएलची असून सद्यस्थितीत ३४० केएल साठा उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा पुरवठा विभागाने दिली आहे. यापूर्वी पेट्रोल पंपांवर पेट्रोल-डिझेलची मागणी पंपधारक हे थेटरीत्या करीत होते. परंतु आता तेल कंपन्यांचे नवीन निकष लागू झाल्याने आधी आरटीजीएस करावे लागत आहे. त्यानंतरच गायगाव डेपोतून पेट्रोलचा टँकर हा पेट्रोल पंपवर येत आहे. या कारणामुळे सुद्धा काही प्रमाणात जिल्ह्यातील पेट्रोल पंपवर पेट्रोलचा साठा कमी-जास्त प्रमाणात उपलब्ध होत असल्याची माहिती मिळाली आहे.

कृषी विद्यापीठातील गंभीर प्रकरण

## तक्रारकर्ती महिला हॉस्पीटलमध्ये दाखल

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला:** महिलांचे हर्रासमेंट, महिला कर्मचाऱ्यांवर शेरेबाजीने कृषी विद्यापीठात कळस घातला आहे. सहयोगी अधिष्ठाता कृषी विभागाच्या प्रशांत नामक कर्मचाऱ्याच्या जाचाला कंटाळून तक्रार करण्यास गेलेल्या महिला कर्मचाऱ्याची प्रकृती खालावल्याची माहिती आहे. वरिष्ठांच्या चेंबरमध्ये ही महिला कर्मचारी कोसळल्याची माहिती असून या सर्व प्रकरणाची चौकशी विशाखा समिती करेल काय अशी विचारणा होत आहे. अखेर या महिला कर्मचाऱ्याला हॉस्पीटल मध्ये दाखल करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली.



सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. २८ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

**अमरावती:** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा शनिवार दि. २८ मार्च रोजी जिल्ह्याच्या दौरा आहे. दौऱ्यानुसार पालकमंत्री बावनकुळे शनिवार, २८ मार्च रोजी सकाळी १२.३० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह येथे माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख यांचा जीवन गौरव सोहळा कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १.३० वाजता शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्टेडीयम स्पोर्ट व वाणिज्य संकुल, नवसारी येथे पोलीस पाटील परिषद व अभिष्टचिंतन सोहळा या कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी २.३० वाजता बसस्टँड ते रेल्वे स्टेशन रोड येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय इमारतीचे लोकार्पण आणि ग्रंथोत्सव उद्घाटन समारंभास उपस्थित राहतील. दुपारी ३ वाजता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथे भेट देतील. त्यानंतर दुपारी ४.३० वाजता सध्दम्म बुध्द विहार, मार्डी रोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन व विपश्यना केंद्राचा लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहतील.

# विद्यापीठ सुध्दा कर्मचाऱ्यांच्या ऋणात राहील - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

### ♦ विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीप्रसंगी समारंभपूर्वक निरोप

प्रतिनिधी २८ मार्च

**अमरावती :** निष्ठा हा कर्मचाऱ्यांना विद्यापीठाशी जोडणारा समान धागा आहे. प्रत्येक कर्मचा-यांनी विद्यापीठाला प्रदिर्घ सेवा दिली आहे. समर्पण, त्याग, श्रध्दा, प्रामाणिकपणा या भावनेने कर्मचा-यांनी जी सेवा दिली, त्यात विद्यापीठ सुध्दा ऋणी राहील, असे उद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एच. नागरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव तथा प्रभारी वित्त व लेखा अधिकारी श्री मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव



डॉ. सुलभा पाटील, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती श्री अनिल काळबांडे, सौ. काळबांडे, श्री अनिल काळे, सौ. काळे, माधव वारके, सौ. वारके, मुरलीधर चिलुरकार, सौ. चिलुरकार, किशोर गजघुमे, गजघुमे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले, देश, राज्याचे जसे वैविध्यपूर्ण असे वैशिष्ट्य आहे, तसेच आपल्या विद्यापीठाचे आहे व कर्मचारी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य, निष्ठेने काम करतात. कर्मचा-यांच्या अशाच प्रामाणिकपणा व निष्ठा यामुळे कर्मचा-यांनी सुध्दा आपल्या कुटुंबाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली आहे व त्यांच्या प्रामाणिकपणा आणि निष्ठेमुळे त्यांच्या कुटुंबातील मुलांनी सुध्दा प्रगती साधली आहे, असे सांगून त्यांनी सर्व सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्वश्री अनिल काळबांडे, अनिल काळे, माधव वारके, मुरलीधर चिलुरकार व किशोर गजघुमे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला, तर सौ. काळबांडे यांचा सौ. मोनाली तोटे पाटील यांनी, सौ. काळे यांचा सौ. मिनल मालधुरे, सौ. वारके यांचा डॉ. सुलभा पाटील, . चिलुरकर यांचा सौ. प्रज्ञा बोंडे व सौ. गजघुमे यांचा सौ. राजश्री देसली यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला. प्रमुख अतिथी डॉ. व्ही.एच. नागरे म्हणाले, विद्यापीठातील कर्मचारी अतिशय प्रामाणिक व निष्ठावंत असून जेथे आपण काम करतो ती आपली ख-या अर्थाने भाकरी असते व प्रामाणिकपणे आपण तेथे काम करीत असतो. विद्यापीठाचे कुलगुरू सुध्दा आपल्या कर्मचा-यांच्या खंबीरपणे पाठीशी असतात आणि कर्मचारी सुध्दा आपली कामे नियमाच्या अधीन राहुनच करतात. कर्मचारी आपल्या पगारातून निवृत्त होत असतो, मात्र कर्तव्यातून नाही, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी नियंत्रण अधिकारी डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव मंगेश वरखेडे,

# अमरावतीत एमडी ड्रग्सचा वाढता विळखा; खा. बळवंत वानखडे यांची लोकसभेत कठोर कारवाईची मागणी

प्रतिनिधी २८ मार्च




**अमरावती :** शहरात एमडी (MD) ड्रग्सचा वाढता प्रभाव अत्यंत चिंताजनक स्वरूप धारण करत असून, तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर या विळख्यात अडकत असल्याचे चित्र समोर येत आहे. अलीकडे पोलीस प्रशासनाने केलेल्या कारवायांमध्ये कोट्यवधी रुपयांचे ड्रग्स जप्त करण्यात आले असून, वारंवार मोठ्या प्रमाणावर धाडी टाकल्या जात आहेत.

या संपूर्ण प्रकरणात गुजरात आणि राजस्थानशी संबंधित कनेक्शन समोर येत असल्याने, या रॅकेटचा मुख्य सूत्रधार कोण आहे, याचा सखोल तपास करण्याची मागणी करण्यात येत आहे. अमरावती हे एमडी ड्रग्सचे मोठे केंद्र (हब) बनत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अलीकडील कारवायांवरून मोठ्या प्रमाणावर ट्रकद्वारे ड्रग्स अमरावतीत येत असून, येथून संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे वितरण होत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. त्यामुळे या वाहतुकीचा संपूर्ण मागोवा घेऊन ड्रग्स पुरवठ्याची साखळी उद्ध्वस्त करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

यासंदर्भात विशेष पथक नेमून सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या गृह विभागाने या प्रकरणात तात्काळ आणि कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, शहरातील वाढत्या ड्रग्स प्रकरणांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने लवकरात लवकर ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. असे मत संसदेत खासदार बळवंत वानखडे यांनी व्यक्त केले.

# लोक धर्मोत्सवाचे यशस्वीरित्या आयोजन

### ♦ सकारात्मक ऊर्जा आणि आशीर्वादांनी भक्तीमय वातावरण

प्रतिनिधी २८ मार्च

**अमरावती:** भगवान महावीर स्वामींच्या २६२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य 'लोक धर्मोत्सव' कार्यक्रम प्रचंड भक्ती, उत्साह आणि आध्यात्मिक वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला. देशभरातील भक्तांनी या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात भाग घेतला आणि धार्मिक लाभ मिळवला.

देवेंद्र ब्रह्मचारी (संस्थापक – महाविरायतन फाउंडेशन) यांनी कार्यक्रमासाठी प्रेरणा आणि मार्गदर्शन केले. जी.एस. सुरेश जैन हे देखील मुख्य आयोजक होते. जनरल डॉ. व्ही.के. सिंग (माननीय राज्यपाल, मिझोराम) आणि श्रीमती रेखा गुप्ता (माननीय मुख्यमंत्री, दिल्ली) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. केंद्रीय मंत्री चिराग पासवान आणि



केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाचे प्रमुख नेते श्री बी. अरुण कुमार यांनी आपल्या सन्माननीय उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढवली. प्रमुख पाहुण्यांमध्ये गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्षभाई संघवी, खासदार मनोज तिवारी आणि बीव्हीपीचे राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश जैन यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे यजमान म्हणून उद्योगपती आणि समाजसेवक चंद्रकुमार मधुसूदन जाजोदिया उर्फ लप्पीभैय्या यांनी सर्व पाहुण्यांचे आणि भक्तांचे स्वागत केले.

कार्यक्रमादरम्यान, भगवान महावीर स्वामींचा अहिंसा, सत्य आणि करुणेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रम आणि भक्तीपूर्ण कार्यक्रमांनी वातावरण सकारात्मक ऊर्जा आणि आशीर्वादांनी भरून गेले होते. देशाच्या विविध भागांतील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची भव्यता अधिकच वाढली. आयोजक समितीने सांगितले की, असे धार्मिक मेळावे समाजात ऐक्य, शांती आणि नैतिक मूल्ये दृढ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. सर्व भक्तांना सुख, शांती आणि समृद्धीच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# शहीद दिनानिमित्त रक्तदानातून मानवंदना; २३० बॉटल्सचे संकलन

प्रतिनिधी २८ मार्च

**अमरावती :** विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी संचालित प्रो राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अँड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनामताई चौधरी, श्री पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा. गजानन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ अजय ठाकरे यांच्या नेतृत्वात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते.

याचाच भाग म्हणून राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लबच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिनाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन उत्साहात पार पडले. समाजसेवेची भावना जोपासत तसेच



शहीद जवानांना अभिवादन करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात शहीदांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे, विभाग प्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आपल्या मनोगतात प्राचार्यांनी शहीदांच्या त्यागाची आठवण करून देत रक्तदानासारख्या महान कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्या व्यक्तीला नवजीवन देण्याचे सर्वोच्च साधन आहे.

या रक्तदान शिबिरात विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व कर्मचारी वर्गाने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिबिरादरम्यान एकूण २२६ बॉटल्स रक्तसंकलन करण्यात आले असून, गरजू रुग्णांसाठी हे रक्त अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तज्ञांच्या मते, अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती व गंभीर आजारांमध्ये रक्ताची तातडीची गरज भासते आणि अशा वेळी रक्तदातेच खरे जीवनदाता ठरतात. रक्त कृत्रिमरीत्या तयार करता येत नसल्यामुळे समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने नियमित रक्तदान करणे अत्यावश्यक आहे, अशी जाणीव या शिबिरातून करून देण्यात आली.

रक्तदान करणाऱ्या सर्व विद्यार्थी, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी, मानवता व सेवाभाव दृढ होतो, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. सदर रक्तदान शिबिरासाठी शासकीय रक्तपेढी, इर्विन हॉस्पिटल अमरावती तसेच डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल हॉस्पिटल रक्तपेढी यांच्या वैद्यकीय पथकांना पाचारण करण्यात आले होते.

# तरोडा येथे कौटुंबिक वादातून मारहाण; पत्नी व मुलाविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी २८ मार्च

**खामगांव :** तालुक्यातील तरोडा येथे कौटुंबिक वादातून झालेल्या मारहाणीच्या घटनेप्रकरणी पत्नी व मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सकाळी १० सुमारास वाजताच्या घडली.

याप्रकरणी अनिल पुंडलिक मुंडे (४०, रा. तरोडा, ता. शेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वंदना अनिल मुंडे व अमोल अनिल मुंडे (दोघेही रा. तरोडा) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, ते आई-वडिलांसोबत वास्तव्यास असून पत्नी व मुलगा वेगळे राहतात. दोघे वारंवार वाद करीत असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. २६ मार्च रोजी सकाळी घराजवळ गेले असता, पत्नीने शिवीगाळ केली. त्यानंतर मुलगा अमोल याने फिर्यादीला मारहाण केली. त्यात ते गंभीर जखमी झाले. या घटनेदरम्यान गावातील जनार्धन मुंडे हे तेथे उपस्थित असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. जखमी अवस्थेत फिर्यादीने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. याप्रकरणी पत्नी व मुलाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# अमरावतीत सिंधी समाजासाठी पीआर कार्ड वाटप विषयक सविस्तर बैठक

प्रतिनिधी २८ मार्च

**अमरावती:** सिंधी समाजाच्या सदस्यांसाठी पीआर कार्ड वाटप करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने महत्वाची बैठक मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता महसूल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे आयोजित केली. ही बैठक जिल्हाधिकारी आशिष येरेकर व महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सिंधी समाजाच्या सदस्यांना योग्य वेळी आणि योग्य प्रक्रियेनुसार पीआर कार्ड देण्याच्या उद्देशाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. पीआर कार्ड समाजातील सदस्यांच्या ओळखीचा महत्वाचा दस्तऐवज आहे आणि प्रशासनाकडून सर्व पात्र व्यक्तींना लवकरात लवकर मिळवून देणे हे प्रमुख उद्दिष्ट ठरले.

बैठकीदरम्यान पीआर कार्डसाठी पात्र सदस्यांची यादी तयार करणे. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी आणि सत्यापन प्रक्रिया. कार्ड वितरणाच्या वेळापत्रकाची आखणी. समाजातील सदस्यांना पीआर कार्ड मिळवण्यासाठी कोणत्या प्रक्रियांचे पालन करणे आवश्यक आहे, याबाबत मार्गदर्शन. भविष्यातील वाटपाची वेळापत्रक आणि सर्वसाधारण शेड्यूल या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# परिमंडळातील आरोग्य यंत्रणेकडे ४.२० कोटींचे वीज बिल थकीत

प्रतिनिधी २८ मार्च

**अमरावती:** परिमंडळातील उच्चदाब व लघुदाबाचा वीज पुरवठा असलेल्या शासकीय आरोग्य संस्थांकडे एकूण ४ कोटी २० लाख रुपयांचे वीज बिल थकीत असून, आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी संबंधित रुग्णालय प्रशासनाने तातडीने बिल भरून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे. महावितरणच्या माहितीनुसार, वीज बिल वसुली ही केवळ आर्थिक बाब नसून संस्थेच्या अस्तित्वाशी निगडीत आहे. त्यामुळे कर्मचारी भर उन्हात थकबाकी वसुलीसाठी प्रयत्न करत असून, प्रतिसाद न देणाऱ्या ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे.

आरोग्य सेवा ही जीवनवाहिनी असल्याची जाणीव ठेवून महावितरणने शासकीय रुग्णालयांचा वीज पुरवठा तातडीने खंडित न करता संबंधित प्रशासनाशी प्रत्यक्ष भेटी, पत्रव्यवहार आणि स्मरणपत्रांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला. मात्र अद्याप अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने, नाईलाजास्तव वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी लागू शकते, असे स्पष्ट करण्यात आले आहे. परिमंडळातील उच्चदाब वर्गवारीतील नऊ महत्त्वाच्या रुग्णालयांमध्ये थकबाकीची स्थिती गंभीर आहे. अमरावती जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयाकडे १ कोटी ४६ लाख रुपये थकीत आहेत. अचलपूर येथील वैद्यकीय अधीक्षक या नावे असलेल्या तीन वीज जोडण्यांवर १ कोटी १४ लाख लाख रुपयांची थकबाकी आहे. मोर्शी येथील संबंधित खात्यावर १.१८ लाख रुपये थकीत आहेत.

तसेच यवतमाळ जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या दोन वीज जोडण्यांवर ५६ लाख रुपये थकीत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# सण-उत्सव संपताच केळीचे दर कोसळले; शेतकरी चिंतित !

### ♦ आखाती देशांकडे फळांची निर्यात बंदचा परिणाम

प्रतिनिधी २८ मार्च

**खामगाव :** सण-उत्सवांचा हंगाम संपल्याने आणि मध्य-पूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांकडे होणारी फळांची निर्यात ठप्प झाल्याने स्थानिक बाजारपेठेत केळीसह इतर फळांची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, केळीच्या दरात लक्षणीय घसरण झाली असून, सध्या प्रतिक्विंटल ४५० ते ५०० रुपयांपर्यंत भाव मिळत आहेत. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. तापत्या उन्हामुळे उत्पादन वाढले असताना, उत्तर भारतात झालेल्या अवकाळी पावसामुळे मागणीत घट झाली आहे. तसेच रमजान ईद आणि नवरात्र उत्सव संपल्यानंतर बाजारातील उठाव कमी झाल्याने परिस्थिती



आणखी गंभीर बनली आहे. निर्यातक्षम केळीचा माल स्थानिक बाजारात कमी दरात येत असल्याने व्यापाऱ्यांचा कल त्याकडे वाढला असून, विदर्भातील केळीला अपेक्षित दर मिळत नाहीत. याशिवाय, व्यापारी थेट बांधावर जाऊन व्यवहार करत असल्याने लिलाव प्रक्रियेवरील विश्वास कमी होत असल्याची भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

**लिलाव प्रक्रियेला फटका !**

बऱ्हाणपूर लिलाव बाजारात स्पर्धा कमी झाल्याने व्यापारी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरेदी करत आहेत.. त्यामुळे पारंपरिक लिलाव प्रक्रियेवरील विश्वास कमी होत असल्याची तक्रार शेतकरी करत आहेत.

**निर्यात ठप्प; बाजारात वाढली आवक !**

आखाती देशांकडे होणारी फळांची निर्यात थांबल्याने केळी, द्राक्षे, संत्री, मोसंबी, टरबूज व खरबूज यांची मोठ्या प्रमाणात स्थानिक बाजारात आवक वाढली आहे. यामुळे पुरवठा वाढून दरांवर दबाव निर्माण झाला आहे.

**अवकाळी पावसाचा फटका; मागणी घटली!**

उत्तर भारतात झालेल्या अवकाळी पावसामुळे फळांच्या मागणीत घट झाली आहे. त्याचबरोबर सण-उत्सव संपल्याने बाजारातील उठाव कमी झाल्याने केळीच्या दरावर नकारात्मक परिणाम झाला आहे

# एकनिष्ठा द्वारे श्री रामनवमी उत्सव पारंपरिक आणि सांस्कृतिक पद्धतीने साजरा

प्रतिनिधी २८ मार्च

**खामगांव :** स्थानिक एकनिष्ठा रक्तसेवा गौसेवा फाऊंडेशन द्वारे श्री रामनवमी उत्सव पारंपरिक आणि सांस्कृतिक पद्धतीने दिनांक २६/०३/२०२६ रोजी साजरी करण्यात आली. सर्वप्रथम एकनिष्ठा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री सुरज यादव, त्यांच्या कुटुंबानी व श्रीरामनवमी उत्सव समिती तर्फे सतिफैल येथील सीतला माता मंदिरात सितला माताची पुजा - आरती करून शोभायात्रा मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली. नंतर श्री छत्रपती शिवाजी महाराज, यांच्या पुतळ्याला हार अर्पण करण्यात आले. सदर शोभायात्रेत आराध्य दैवत प्रभु श्री रामाची मूर्ती आणि शिष चे दानी - बाबा खाटूश्यामजी ची झाकी छत्रपती शिवाजी महाराज झाकी व तोफ गोरिला



लोकांचे आकर्षणाचे केंद्र होते आणि महिला लहान मुला मुलीच्या टाळकरी - वारकरी यांच्या पाऊलीने भक्तिमय उत्साहित वातावरण निर्माण करून सर्वांना मंत्रमुग्ध केले होते. या सह कदमापुर वाद्य मंडळी, ढोल - ताशे व इतर वाद्यांमुळे सांस्कृतिक आणि पारंपरिक वातावरणात श्री रामनवमी उत्सव साजरी करण्यात आली. सदर मिरवणुकीत आपल्या गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी सदिच्छा भेट देऊन एकनिष्ठा संघटनेचे कार्यांचे व समितीचे कौतुक केले. शोभायात्रा सहभागी मार्गदर्शक शिवमुरत यादव, नरेश सुरेका, ज्ञानेश सेवक सर, रघुनाथ काळे, किशोर बुंदेले, संजय थोरात, मनोज अहिर, सुनिल राऊत, हितेश पदमगिरवार, रवी माळवंदे, राजेश यादव, युवराज भेरडे तसेच एकनिष्ठा रामनवमी जन्मोत्सव समिती प्रमुख धिरज यादव यांच्या मार्गदर्शनात समितीचे अध्यक्ष प्रदीप शमी, मोहीत वरणगांवकर, सचिव डॉक्टर ऋषीकेश उन्हाळे पाटील, अमोल तायडे, शुभम कुंदनवार, योगेश राऊत, चेतन कदम, नरेश मसनेवार, मनोज अहिर, अकील खान, शुभम यादव, अजय ताठे, गोलु इंगळे, खुशाल सेवक, निखिल यादव, मंगेश चराटे, महादेव पन्हाळकर, कुंदन यादव, अजय थोरात, आदित्य अहिर, अंकीत यादव, शिव यादव, विरेंद्र पिल्ले, पियुष यादव, शुभम शमी, सिद्धेश्वर निर्मळ, अनुज यादव, कार्तिक यादव, अर्पण यादव, वैभव कापडे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते. श्री राम मंदिर, सिव्हील लाईन येथे सदर शोभायात्रेचे समारोप करण्यात आले. समारोप करतांना फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुरज यादव यांनी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते, पोलीस प्रशासन आणि शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी तन - मन - धनाने सहकार्य करणारे नागरिकांचे आभार मानले.

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. २८ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात एचपीव्ही लसीकरणाला वाढता प्रतिसाद

**अकोला:** राज्यभर सुरू असलेल्या एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेला अकोला जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे यासाठी १४ वर्षे पूर्ण झालेल्या आणि १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींना ही लस देण्यात येत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत सुमारे पावणेसहाशे मुलींना लसीकरण करण्यात आले आहे. लसीबाबत नागरिकांत काही गैरसमज असल्यास ते दूर करण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी बैठकीत दिले होते. त्याबाबत प्रशासन, आरोग्य विभागातर्फे जनजागृती होत आहे. त्यामुळे लसीकरण मोहिम गतिमान झाली आहे. आरोग्य विभागातील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या मुलींना लस देऊन इतर पालकांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

## कुंभारी येथे रामनवमी उत्साहात; शिव काठीच्या मिरवणुकीने गाव दुमदुमले

**अकोला :** अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कुंभारी येथील अतिशय प्राचीन व जागृत श्री राम मंदिरात रामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त मंदिराचे विश्वस्त सुरेश श्रीकृष्ण बहादुरकार यांच्या हस्ते श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्तीचे विधीवत पूजन व आरती करण्यात आली. 'जय श्रीराम'च्या जयघोषाने संपूर्ण कुंभारी नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली. रामनवमी निमित्त मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दिवसभर धार्मिक कार्यक्रमांनी वातावरण भारावून गेले होते. यानंतर संध्याकाळी अनेक वर्षांची परंपरा असलेल्या शिव काठीची वाजत-गाजत भव्य मिरवणूक गावातून काढण्यात आली.

## ब्रह्माड हे आदिमायेची स्वरूप-जनक शास्त्री

**अकोला:** आदिमाया ही संपूर्ण ब्रह्मांडाची मूळ ऊर्जा व त्रिलोक्याची सुरुवात मानली जाते. तिचे स्वरूप विश्वव्यापी आहे, त्यातूनच सर्व काही उद्भवते आणि तिच्यातच सर्व विलीन होते. अश्या आदिमायेचे अधिष्ठान असलेले देवीभागवत नित्य श्रवण केल्याने दोषमुक्ती होत असल्याचा हितोपदेश पु शास्त्री जनक जोशी यांनी दिला. जय अंबे माता संस्थान व डॉ. तृप्ती मुकेश भाटिया यांच्या वतीने शास्त्रीनगर येथील जय अंबे माता संस्थान प्रांगणात सुरू असलेल्या पु शास्त्री जनक जोशी यांच्या श्रीमद् देवी भागवत कथेत त्यांनी आपले पंचम पुष्प गुंफून आदिमायेची महती विशद केली.

## पाणीपट्टी कर आणि मालमत्ता कर भरण्याकरिता सुट्टीच्या दिवशीही कार्यालय सुरु

**अकोला:** शहरातील नागरिकांना पाणीपट्टी कर आणि मालमत्ता कराचा भरणा करणे अधिक सोयीचे व्हावे यासाठी प्रशासनाद्वारा शनिवार आणि रविवार सुट्टीच्या दिवशीही कार्यालय सुरू ठेवण्यात येणार आहे कृपया नागरिकांनी याची नोंद घेऊन या संधीचा लाभ घेऊन आपला पाणीपट्टी कर आणि मालमत्ता कराचा भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन मनपा प्रशासना द्वारा करण्यात आले आहे.

# वडाळी देशमुखला रामनवमीला ढोल नगाऱ्याच्या गजरात राम जन्म व महादेवाचा लग्न सोहळा

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोट:** तालुक्यामधील वडाळी देशमुख येथे रामनवमीच्या शुभ-पर्ववावर श्री गणेश जयरामनाथ महादेव संस्थानमध्ये भक्तीमय वातावरणामध्ये अष्टमीला तीर्थ स्थापना झाली. महादेवाला जलाभिषेक करण्यात आला.

बुद्धेश्वर ढोल नगारा भजनी मंडळाच्या पुढाकाराने ज्येष्ठ नागरिकांनी शिवपार्वती विवाह सोहळा, देवकुंडी कार्यक्रम साजरा केला. गोपालकाला भाविकांच्या प्रचंड उपस्थितीत पार पडला. महाप्रसादात रामफळाचे महत्व दिले जाते. सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

श्री गणेश जय रामनाथ महादेव मंदिराच्या





गाभाऱ्यामध्ये संत चतुर्भुज महाराजांची पाय विहीर आहे. भगवंतांच्या मुर्त्या, सजवलेले रामेश्वर मंदिर व गाभाऱ्यामध्ये श्री गणेशाय मूर्ती, श्री राम, लक्ष्मण, सीतामाई व हनुमान विराजमान आहेत. दगडामध्ये कोरलेले महादेव शिवलिंग, समोर महाकाय नंदी मंदिराचे कौस्तुभ ठरत आहे, चतुर्भुज महाराजांनी जो अन्य त्याग केला होता याच त्यागाला एक गाय दान देऊन महाराजांना दूध पिण्याचा भाविकांनी आग्रह केला होता तेव्हा महाराज दूध घेऊन अन्य त्याग करण्याचे हेच पौराणिक पवित्र समाधी स्थळ मंदिर आहे. मंदिरामध्ये भव्य दिव्य सभा मंडप त्यामध्ये चतुर्भुज महाराजांची तेजोमय मूर्त विराजमान आहे. भाविकांना पिण्याचे पाणी राहण्यासाठी व सांप्रदायिक व इतरही कार्यक्रमासाठी उत्तम विश्वस्त आयोजकाकडून उत्तम चोख व्यवस्था केली आहे. २ एप्रिल संध्याकाळी मंदिरात श्री संत चतुर्भुज महाराज प्रगट दिन साजरा होणार आहे.


श्री संत परमहंस चतुर्भुज महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव सोहळा हा मोठ्या स्वरूपात पार पडतो.

श्री संत चतुर्भुज महाराज जन्मोत्सव व विशेषता हजारो दिव्यांच्या लखलखित रोषणाई मध्ये दीप उत्सव पार पडतो. श्री हनुमान जयंती उत्सवाला महिला भजनी मंडळ व भाविक महिला स्त्रोते मंडळाकडून महाराजांच्या जीवन प्रणालीवर सामूहिक एक दिवसीय पारायण सोहळा पार पडत असतो. व महाप्रसादाचे आयोजन केल्या जाते.

# घुसर येथे पाणी प्रश्न पेटला ; आंदोलन छेडणार

प्रतिनिधी २८ मार्च

**घुसर:** ग्राम घुसर येथे ५० दिवसापासून गावात पिण्याचे पाणी नाही आणि ही समस्या कित्येक वर्षापासून आजही जशीच्या तशीच आहे परिणामी पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था नसल्याकारणाने एक एक दीड दीड महिन्याचे साठवलेले पाणी दूषित होते व तेच पाणी पिणे ग्रामस्थांना भाग पडते त्यामुळे बरेच वेळा दूषित पाणी पिल्यामुळे बऱ्याच वेळा ग्रामस्थांना पोटाचे विकार सतीचे आजार व डायरी याची लागण सुद्धा झालेली आहे उपरोक्त कृत्रिम पाणी टंचाई व आरोग्याशी निगडित असलेली गंभीर पाणी समस्या लक्षात घेता संबंधितांना लेखी निवेदने देऊन धरणे आंदोलन व उपोषण ग्रामस्थांनी केलेले आहे तसेच १९/०३/२०२५ ला आत्मदहनाच्या साठी लेखी निवेदन देऊन सुद्धा इशारा देण्यात आला होता सदर आंदोलनाचा परिणाम म्हणून संबंधित यंत्रणांनी घुसर संभ ते घुसर इ एस आर पर्यंत नवीन पाईपलाईन टाकलेली आहे पाईप लाईन टाकून एक



वर्षाचा कालावधी लोटला असताना सुद्धा संबंधित यंत्रणांनी ही पाईप लाईन घुसर संभ ते घुसर इ एस आर ला जोडून कार्यान्वित केलेली नाही ही नवीन पाईप लाईन जोडून कार्यान्वित करावी आदी मागण्या आहेत.

६ एप्रिल रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर घुसरकर महाराज सभागृह येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. धरणे आंदोलन करिता अशोक शिरसाट, संतोष कोळकर, भीमराव गोपनारायण, रमाकांत पागृत, बाबुलाल गोपनारायण, गोविंदराव डोंगरे, पुंडलिक लोथे, भास्कर मातुरकार, शुद्धोधन गोपनारायण, प्रवीण गोपनारायण, सुरेश वानखडे, उमेश गोपनारायण, विजय कांबळे, दत्ताभाऊ गालफाडे, विनोद पारस्कर, गणेश गोपनारायण, गौतम शिरसाट, भीमराव गोपनारायण, दशरथ सातपुते, पवन कांगटे हे धरणे देतील.

# अकोटमध्ये भीमा तुझ्या जन्मामुळे महानाट्याचे आयोजन

◆ ॲड. प्रकाश आंबेडकर यांची उपस्थिती, पुण्याच्या ६० कलावंताचा संच

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोट:** आकोट शहरामध्ये प्रथमच आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेबांचा संपूर्ण जीवन परिचय प्रत्यक्ष कलावंताच्या सादरीकरणातून पाहायला मिळणार आहे. रविवार, २९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता स्थानिक श्री सरस्वती विद्यालयात भिमा तुझ्या जन्मामुळे या महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या महानाट्याचे निर्माता दिग्दर्शक प्रा. प्रकाशकुमार वाघमारे तर मार्केटिंग व प्रसिद्धी प्रमुख एड .संतोष गजानन खवले हे आहेत. सम्यक दृष्टी शिक्षण बहुउद्देशीय





सेवाभावी संस्था अध्यक्ष निखिल वानखडे जळगाव नहाटे सदर कार्यक्रमाचे उद्घाटक वंचित बहुजन आघाडी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर हे असून सदर कार्यक्रमाला विशेष आकर्षण म्हणून नाळ व नाळ -२ या चित्रपटासाठी राज्य व राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता श्रीनिवास पोकळे व त्याच बरोबर भीमा तुझ्या जन्मामुळे या चित्रपटातील अभिनेता श्रीवेश देशमुख, अभिनेता अविनाश नाटेकर, अभिनेता सुशील ठाकरे, अभिनेता गौरव धांडे, अभिनेता उमेश गारोळे हे देखील उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष मंगेश चिखले मा. सभापती तर प्रमुख उपस्थिती म्हणून स्वातीताई चिखले आणि स्वागताध्यक्ष एड संतोष खवले हे असतील. सदर कार्यक्रमांमध्ये पुणे येथील ६० कलावंताचे विशेष पथनाट्य संच भव्य स्टेज साऊंड सिस्टिम व लाईट इफेक्ट अशा कलावंताच्या सादरीकरण असणारे भव्य महानाट्य प्रत्यक्ष दर्शनी स्टेजवर पाहण्याची सुवर्णसंधी आयोजन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय हा महानाट्याच्या स्वरूपात भव्य स्टेजवर सादर केल्या जाणार आहे तसेच सदर कार्यक्रमांमध्ये तालुक्यातील युवा उद्योजक व समाज सुधारक यांना समाज भूषण जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित केल्या जाणार आहे. तरी आपण सहपरिवार या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक सम्यक दृष्टी बहुउद्देश सेवाभावी शिक्षण संस्था अध्यक्ष निखिल भगवान वानखडे राहणार जळगाव नहाटे यांनी केले आहे.

# मुंगसाजी माऊली जीवनामृत ग्रंथाचे सामूहिक पारायण

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला :** परमहंस पुडंलीक महाराज आश्रम, राऊतवाडीच्या वतीने श्रींच्या आगमनाप्रित्यर्थ सामुदायीक जीवनामृत पारायण सप्ताह २९ मार्च ते ०४ एप्रिल पर्यंत भगवान मुंगसाजी माऊली जीवनामृत ग्रंथाचे सामूहिक पारायण आयोजित केले आहे.

४ एप्रिलला परमहंस पुंडलिक बाबा, पुंडलिक नगर, मुर्तीजापुर यांचे पालखीचे आगमन होईल. गायनाचार्य, गजानन महाराज जाधव, वैभव महाराज काळे व मृदुंगाचार्य ऋषीकेश थोरात टाळकरी जय शिवशंकर साम्प्रदायीक भजन मंडळ संध्याकाळी ५ ते ७ हरिपाठ होईल व नंतर ७ ते ९ ह.भ.प. दिलीप महाराज पान्हेरा पांची कीर्तन होईल.



०५ ला सकाळी ७ ते ९ श्रींच्या पालखीची मिरवणूक निघेल. बाबांचे लहान बंधू ह.भ.प. विठ्ठल देव पातोंड हजर राहतील. नंतर ह.भ.प. योगेश महाराज खवले यांचे काल्याचे किर्तन होईल. दहीहंडी कार्यक्रम परमहंस पुंडलिक देव यांचे वंशज ह.भ.प. विवेक भाऊ पातोंड व्यवस्थापक पुंडलिक महाराज संस्थान मूर्तीजापुर यांच्या हस्ते होईल. ह.भ.प. हरी महाराज तालोट, ग्रंथ पारायणाची वेळ सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत. शिवमहापुराणाचे व्यासपिठ ह.भ.प. सविताताई बनातकर, चिखलगांव, संगीत संघ : हरिष महाराज पाटील, मयुर महाबाज चिलवन, व इतर संमित संघ शिवमहापुराणाची वेळ : संध्याकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत. ०५ रोजी दुपारी १२.३० पासुन महाप्रसाद राहील. भाविक भक्तांनी उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

## गीता नगरात झाले हिंदू संमेलन

**अकोला:** स्थानिक गीता नगरात गंगानगर, अकोली, हिंगणा, सोमठाणा समवेत श्री शक्ती धाम मंदिराच्या प्रांगणात सकल हिंदू समाजाच्या वतीने नुकतेच भव्य हिंदू संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या संमेलनाच्या निमित्ताने गीता नगरमधील श्री शिव मंदिरापासून श्री शक्ती धाम मंदिरापर्यंत सुमारे ३०० महिलांची भव्य कलश यात्रा काढण्यात आली. या यात्रेत भजनी मंडळ तसेच लहान मुलांच्या दिंडी पथकाने उत्साहपूर्ण सहभाग नोंदवत यात्रेचे नेतृत्व केले.

# वारखेड शेतशिवारात वनविभागाची टीम दखल

प्रतिनिधी २८ मार्च

**हिवरखेड:** वारखेड फाट्या नजीक गेल्या आठवड्यात बिबट्याने दहशत पसरविली असून आपला दबदबा कायम ठेवला यामुळे भीतीचे वातावर पसरले आहे, तसेच या भागात सौंदळा गावात मरीमाय संस्थानवर मोठी चैत्र यात्रा भरते या परिसरातील भीती कमी व्हावी याकरिता वनविभागाने कुठलीच कसरत कमी नाही ठेवली, वनविभागाने वारखेड शेतशीवरातील शेतकरी अरविंद खारोडे वेताळ बाबा संस्थान या शेतात सिसिटव्ही कॅमेरे लावून



बिबट्याला जेरबंद करण्यासाठी सर्व उपाय योजना आखल्या यावेळी वनविभागाच्या वनरक्षक कुमारी मैडम वनपाल वनविंभागाचे कर्मचारी उपस्थित होते, वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ही उपाय योजना आखण्यात आली, नागरिकांना भीती मुक्त केल्याशिवाय राहू नये असे सुद्धा वनविभागाने सांगितले.

# मारुती महाराज संस्थान पिंपरी जैनपूरची अनोखी प्रथा

◆ ढोलाच्या गजरात अनोखे सोंग घेण्याची परंपरा





प्रतिनिधी २८ मार्च

**अकोट:** सध्या महाराष्ट्रातील अनेक छोट्या मोठ्या गावांमध्ये छोट्या-मोठ्या जत्रांचे आयोजन सुरू आहे. या सर्व ठिकाणी विविध देवी-देवतांच्या उत्सवानिमित्त किंवा आनंदासाठी म्हणून या भव्य जत्रांचे आयोजन केले जाते तसेच महत्त्वाच्या सणानिमित्तही विविध ठिकाणी यात्रा भरत असतात गावोगावी महादेव, खंडोबा, म्हसोबा, मारुती महाराज यासह अनेक देवी-देवतांच्या जत्रा भरत असतात गावो गावी भरणाऱ्या या जत्रा आपल्या लोक संस्कृतीशी संबंधित असून त्या महत्त्वाच्याही असतात. अशीच एक अनोखी जत्रा अकोट हिवरखेड रोडवर येणाऱ्या पिंपरी जैनपुर येथील मारुती महाराज संस्थान येथे सुरू आहे. रामनवमी पासून हनुमान जयंती पर्यंत येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. गावातील हे मुख्य मंदिर असून देवालयात प्रभू श्रीराम आणि त्यांचे निस्सीम भक्त हनुमंताची सुंदर मूर्ती आहे. मारुतीरायाचे हे मंदिर अत्यंत जागृत मानले जाते. सात दिवसीय या जत्रेत ढोलांचे भजन, पालखी मिरवणूक, देवाचा गाडा ओढणे, किर्तन आधी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ज्या दिवशी ढोलाचे भजन केले जाते त्या दिवशी गावातील उत्साही युवक विविध सोंग घेतात हे पाहायला पंचक्रोशीतील नागरिक मोठी गर्दी करतात. या जत्रेनिमित्त विवाह करून गेलेल्या मुली आपल्या माहेरी आवर्जून येतात. या सात दिवसात पालखी काढली जाते या पालखीमध्ये राधा कृष्णाची मूर्ती ठेवली जाते या पालखी समोर गावातील लहान मुलांना झोपविले जाते त्यावरूनही पालखी नेली जाते यामागे ही धारणा आहे की मुलांवरून पालखी नेल्यावर लहान मुलांची सर्व विघ्ने दूर होतात, गावात सायंकाळी तीन दिवस महाप्रसादाचे आयोजन केले जाते या तीन दिवसात एकाही घरात चूल पेटवली जात नाही जत्रेनिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे दुरून दुरून लोक ही जत्रा पाहण्यासाठी येत आहेत या जत्रेनिमित्त गावातील एकोपा टिकून राहण्यास मोठी मदत होते, मंदिरासमोर सामूहिक आरती केली जाते यावेळी वातावरणात एक अलौकिक अनुभूती निर्माण होते

# उद्योगपती जितेन्द्र मिटकरी अकोला- वैभव पुरकाराने सन्मानित

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला:** माऊली फांउडेशन तर्फे वार्षिक पुस्काराचा घोषणा गुढीपाडवाच्या मुहर्तावर करण्यात आली. साई फ्लेक्स चे संचालक जितेन्द्र बाळूआप्पा यांनी अल्पावधित अकोला शहरात उद्योग निर्मिती करून अनेक होतकरू बांधवाना रोजगार प्राप्त करून देवून गिहाईक त्वरीत सेवा उपलब्ध करून देत आहात.व शहारात अग्रगण्य संस्था



निर्माण केली या कर्तृत्वान कार्याची दरवल घेवून माऊली फांउडेशने अकोला -वैभव २०२६ पुरस्काराने त्यांच्या कार्यालयात वैभवपुर्ण स्वरुपात मेमोटो , सन्मानपत्र, पुरस्कार राशी १,१११/शाल पुष्पगुच्छ देवून गौरवपुर्ण, भरीव सत्काराने फांउडेशन तर्फे गुढीपाडव्याचे औचित्य साधून स्तंभलेखक लेखक सुधाकर खुमकर यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी फांउडेशनचे ज्ञानेश्वर मांडेकर , उपाध्यक्ष , सैय्यद रब्बानी , सचिव अशोक पारधी , संचालक मंगेश लांडे ,अजय बांडी, गोपालसिंह गौत्तम , गोकुल कलंत्रीआदि मान्यवर उपस्थित होते .

# सौंदळाच्या मरिमाय संस्थानात भरणार चैत्र यात्रा

प्रतिनिधी २८ मार्च

**हिवरखेड:** ग्राम सौंदळा येथील जागृत मरीमाय संस्थान परिसरात चैत्र पाडवा पौर्णिमा भव्य यात्रा महोत्सव साजरा केला जातो. यंदा ही यात्रा २ व ३ एप्रिल दरम्यान साजरी केली जाणार आहे. या यात्रेत दूर दुरून भाविक मरीमाता चरणी नतमस्तक होऊन आपले नवस फेडतात काही भाविक काट्यावरचे लोटांगण घेतात, तर काही भाविक नाळे टोचून घेतात, गाढे ओढणे, मातेची गाव मिरणुक काढणे, असे विविध धार्मिक



उपक्रम साजरे होतात, व दुसऱ्या दिवशी भव्य महाप्रसाद संस्थांनच्या वतीने वितरीत केला जातो, हिवरखेड पोलिसांनसह अकोला जिल्ह्यातील पोलिस या यात्रेत तैनात असते, ग्राम सौंदळा येथील ग्रामपंचायत, पोलिस पाटील, तंटामुमुक्ती, व गावकरी मोठ्या उत्साहाने यात्रेत योगदान करतात, मरीमाय सुद्धा आजही भक्तांचे संकट निवारते असा भाविकांचा विश्वास आहे.

CNR No.: MHAKO6-00-2026 प्रोसेस क्र. 1251/2026 दि. 25/03/2026

**जाहीर नोटीस**

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ), अकोट यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क. 88/2026 चौकशी तारीख 23/04/2026

**अर्जदार : १. दिपक प्रकाशराव कुलट, वय ४१, धंदा- मजुरी**
**रा. शिवाजी कॉलेज रोड, श्रीकृष्ण कॉलनी अकोट,**
**ता. आकोट जि. आकोला**
**२. सौ. शुभांगी भुपेंद्र पाटील, वय ४६, धंदाः घरकाम**
**रा. महाराणा प्रताप चौक, डाबकी रोड, गोडबोले प्लॉट**
**अकोला ता. जि. आकोला**
**३. सौ. शितल आशिषराव तायडे, वय- ४४, धंदाः घरकाम**
**रा. अवदुत कॉलनी, दर्यापूर रोड अकोट, ता. आकोट जि. आकोला**
**--- विरूद्ध ----**
**गैरअर्जदार : कोणीही नाही.**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VII 1827 चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांन न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क्र. १ ते ३ चे वडील नामे प्रकाशराव महादेवराव कुलट हे आपले संपुर्ण जिवनकाळात अवधुत कॉलनी आकोट ता. अकोट जि. अकोला येथेन राहले व तेथेच दि. ०२/०७/२०१० रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत प्रकाशराव महादेवराव कुलट यांची पत्नी व अर्जदारांची आई नामे रत्नमाला प्रकाश कुलट ह्या आपल्या संपुर्ण जिवनकाळात अवधुत कॉलनी अकोट ता. अकोट जि. अकोला येथेच राहिल्या व तेथेच दि. १४/१०/२०२५ रोजी राहते घरी अवधुत कॉलनी अकोट ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाल्या आहेत. तसेच मयत प्रकाशराव महादेवराव कुलट यांची आई नामे सुशिलाबाई महादेवराव कुलट ह्या बरेच वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. मयत प्रकाशराव महादेवराव कुलट व मयत रत्नमाला प्रकाशराव कुलट यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीह कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक २७/०३/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार,**
**सहायक अधिक्षक (न्यायीक)**
**दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट,**
**जि. अकोला.**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २८ मार्च २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# ठेका मराठवाड्याचा; उत्खनन विदर्भाच्या हद्दीत

**उमरखेड परिसरात अवैध रेती उपसा; प्रशासनावर संगनमताचा संशय**



प्रतिनिधी २८ मार्च

**उमरखेड** : मराठवाड्यातील रेतीघाटाचा ठेका असताना प्रत्यक्ष उत्खनन विदर्भाच्या हद्दीत होत असल्याचा धक्कादायक प्रकार उमरखेड तालुक्यात उघडकीस येत आहे. दिघी रेतीघाटाच्या नावाखाली बोरी व चातारी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उपसा सुरू असल्याची माहिती समोर येत असून, यामागे राजकीय दबाव आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाचा संशय व्यक्त केला जात आहे.

कागदोपत्री ठेका मराठवाड्यातील असला तरी प्रत्यक्षात उमरखेड हद्दीतून दररोज १५ ते २० ट्रॅक्टरद्वारे रात्रंदिवस रेती उपसा केला जात आहे. यामुळे नदीपात्रांची मोठ्या प्रमाणावर हानी होत असून, ठिकठिकाणी खोल खड्डे पडले आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होत असतानाच शासनाच्या महसुलालाही मोठा फटका बसत आहे. तालुक्यातील सर्व रेतीघाटांवर बंदीचे आदेश असतानाही हा प्रकार सुरू असल्याने महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधितांवर कारवाई का होत नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**बंदी आदेशांचा बोजवारा**

■ सातही रेतीघाट बंद ठेवण्याचे आदेश लागू असतानाही उत्खनन सुरूच आहे. यामागे राजकीय हस्तक्षेप की आर्थिक स्वार्थ, याची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## नेरमध्ये सुव्यवस्था व कायद्याचा प्रश्न गंभीर

प्रतिनिधी २८ मार्च

**नेर** : शहरासह तालुक्यात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला असल्याने उपाययोजनांची गरज आहे.

काही पानटपऱ्यांवर बंदी असलेल्या वस्तूंची विक्री केली जाते. गुन्हेगारी घटनाही वाढल्या आहे. काही दिवसांपूर्वी पोलिस ठाण्यासमोरच लोखंडी रॉडने हल्ला झाल्याची घटना घडली होती. २४ मार्च रोजी नबाबपूर येथील शाळेजवळ मुलीच्या छेडछाड केल्याचा जाब विचारणाऱ्या व्यक्तीची हत्या केली. शहरातील बहुतांश ठिकाणची सीसीटीव्ही यंत्रणा बंद आहे. काही अवैध धंद्यांवर कारवाई होत नसल्याने पोलिस विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. शाळा, महाविद्यालय परिसरात पोलिस बंदोबस्त वाढवावा, नबाबपूर परिसरात पोलिस चौकी स्थापन करावी, अशी मागणी आहे. या पार्श्वभूमीवर नेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ठाणेदारांना निवेदन देऊन कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष सुनील खाडे, युवराज पाटील अर्मळ, माजी सभापती इरफान अकबानी, हरेश्वर कनसे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष अरुणराव खडसे, कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष सरफराज खान, शेख तौफिक, गजानन गोळे, राहुल काळे, श्याम देशमुख, साहेबराव साबळे, शेख अकिल, प्रा. अमोल घरडे, रुपेश अर्मळ आदी उपस्थित होते.

# गॅस तुटवडा तीव्र; सिलेंडरसाठी रात्रीपासून रांगा

**पुसदमध्ये नागरिकांची मोठी गर्दी; महिलां-ज्येष्ठांना फटका**



प्रतिनिधी २८ मार्च



**पुसद** : शहरात गॅस सिलेंडरच्या तीव्र तुटवड्यामुळे नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांना रात्री ८ वाजल्यापासूनच रांगेत उभे राहावे लागत असून, पहाटेपर्यंतही गर्दी ओसरण्याचे नाव घेत नाही.

अनेक नागरिकांनी आपला क्रमांक लागावा यासाठी रात्रीच ठिकाणी मुक्काम ठोकला. काहीजण जमिनीवर बसून तर काहीजण झोपूनच आपल्या पाळीची प्रतीक्षा करत असल्याचे चित्र दिसून आले.

मात्र, एवढा वेळ थांबल्यानंतरही अनेकांना सिलेंडर न मिळाल्याने रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे.

या तुटवड्याचा सर्वाधिक फटका महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना बसत असून, घरगुती कामकाज विस्कळीत झाले आहे. दैनंदिन जीवनावर त्याचे गंभीर परिणाम जाणवत आहेत.

नागरिकांनी संबंधित प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे.

# पेट्रोल-डिझेलचा ठणठणाट; 'नो स्टॉक'मुळे १० पंप बंद

प्रतिनिधी २८ मार्च

**महागाव** : गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात पेट्रोल व डिझेलचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, तब्बल १० पेट्रोल पंप 'नो स्टॉक'मुळे बंद पडले आहेत. इंधन उपलब्ध नसल्याने वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, दळणवळण व्यवस्थेवरही त्याचा परिणाम होत आहे.

सध्या शेतीकामांची लगबग सुरू असताना ट्रॅक्टर व इतर यंत्रसामग्रीसाठी डिझेलची मोठी गरज आहे. मात्र, प्रमुख पंपांवर 'नो स्टॉक'चे फलक लागल्याने शेतकरी चिंतेत आहेत. दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना इंधनासाठी शेजारच्या तालुक्यांत जावे लागत असून, अनेक वाहने रस्त्यातच बंद पडल्याचे चित्र दिसून येत आहे.

उपलब्ध माहितीनुसार, इंधन पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून वेळेवर साठा न मिळाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. काही मोजक्या सुरू असलेल्या पंपांवर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या असून, नागरिकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे.

या इंधन टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांसह व्यावसायिकांचेही मोठे नुकसान होत आहे. अनेक कामे ठप्प झाली असून, परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन इंधन कंपन्यांशी समन्वय साधावा व तालुक्यात पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# पत्रकारांची मुस्कटदाबी; पोलिस अधिकाऱ्यावर कारवाई करा

प्रतिनिधी २८ मार्च



**उमरखेड** : पत्रकारांशी अर्वाच्य भाषेत गैरवर्तन करून धक्काबुक्की केल्याच्या आरोपावरून सहाय्यक पोलिस निरीक्षक पंकज दाभाडे यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दैनिक वृत्तपत्र वार्ताहर संघाच्या वतीने २७ मार्च रोजी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमत गायकवाड यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनानुसार, २३ मार्च रोजी दारव्हा–कारंजा महामार्गावरील भुलाई टोलनाका बंद करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाचे वृत्त संकलन करण्यासाठी विविध माध्यमांचे प्रतिनिधी घटनास्थळी उपस्थित होते. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी बॅरिकेड्स लावले होते. पत्रकारांनी ओळखपत्र दाखवल्यानंतर त्यांना पुढे जाण्याची परवानगीही देण्यात आली होती.

मात्र, परिस्थिती शांत असताना कर्तव्यावर तैनात असलेल्या सहाय्यक पोलिस निरीक्षक दाभाडे यांनी अचानक आक्रमक भूमिका घेतल्याचा आरोप आहे. त्यांनी नागरिकांसह पत्रकारांनाही शिवीगाळ करत हाकलण्यास सुरुवात केली.

यावेळी पत्रकार केशव सवळकर यांनी आपली ओळख सांगण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा हात पकडून धक्काबुक्की करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे.

या घटनेमुळे पत्रकारांच्या कामात अडथळा निर्माण झाला असून, लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावरच गदा आल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. संबंधित पोलिस अधिकाऱ्यावर तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# रामनवमीच्या शोभायात्रेत धार्मिक सौहार्दाचा संदेश

**इरफान मलनस यांच्या अन्नदान उपक्रमाचे सर्वत्र कौतुक**



प्रतिनिधी २८ मार्च

**यवतमाळ** : रामनवमी निमित्त यवतमाळ शहरात भव्य शोभायात्रा उत्साहात काढण्यात आली. शहरातील विविध मार्गांवरून फिरणाऱ्या या शोभायात्रेत हजारो भाविकांनी सहभाग घेतला. या दरम्यान दत्त चौकात इरफान मलनस व त्यांच्या मित्रपरिवाराच्या वतीने अन्नदान व जलसेवेचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे नागरिकांनी खूप कौतुक केले.

शोभायात्रेत सहभागी झालेल्या भाविकांसाठी त्यांनी प्रेमाने अन्नदान केले तसेच पिण्याच्या पाण्याची उत्कृष्ट व्यवस्था केली. हिंदूंच्या सणाच्या दिवशी एका मुस्लिम युवकाने पुढाकार घेत राबविलेल्या या उपक्रमामुळे धार्मिक सौहार्दाचा सुंदर संदेश समाजात पोहोचला.

या उपक्रमाला यवतमाळ अर्बन बँकेचे अध्यक्ष नितीन खर्चे सर, अजय मुंदडा, लक्ष्मीकांत लोळगे, डॉ दीपक शिरभाते, डॉ. राशतवार, जुगल तिवारी, डॉ. महेश चव्हाण, निशांत गौतम, बंटी गुप्ता, अरविंद इंगळे, प्रथमेष बट्टलवार, साजिद शेख, आकाश धूरट, रोहित राठोड, बंटी श्रीवास, असलम पठाण, सलमान मालानी, राजेश गढीकर यांच्यासह अनेक मान्यवर व भाजपाच्या नेत्यांनी भेट देत इरफान मलनस यांचे कौतुक केले.

"शहरात धार्मिक सद्भावना टिकून राहावी, आपसातील प्रेम वृद्धिंगत व्हावे" असा सकारात्मक संदेश या माध्यमातून देण्यात आला. अनेक भाविकांनी या मंडपातून अन्नदानाचा लाभ घेतला, तर तहानलेल्या बांधवांना जलसेवा मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.

सामाजिक एकोपा टिकवण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले. विशेष म्हणजे, कोरोना काळातही इरफान मलनस यांनी अन्नदान, सॅनिटायझर व मास्कचे वाटप करून समाजसेवेचा आदर्श ठेवला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्यामुळे त्यांचा हा उपक्रमही सर्वत्र कौतुकास्पद ठरला आहे.

# शहरात इंधन व गॅस टंचाईचा प्रश्न

**शहर काँग्रेसचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

प्रतिनिधी २८ मार्च

**यवतमाळ** : शहरात पेट्रोल, डिझेल तसेच घरगुती गॅस सिलेंडरच्या उपलब्धतेबाबत निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहर काँग्रेस कमिटी, यवतमाळच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. २७ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात हे निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या शहरातील अनेक पेट्रोल पंपांवर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत असून तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. काही ठिकाणी पेट्रोल पंप बंद असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम, अस्वस्थता व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यवतमाळ शहरात सुमारे २८ ते ३० पेट्रोल पंप विविध तेल कंपन्यांचे कार्यरत असून इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम, रिलायन्स पेट्रोलियम व नायरा एनर्जी या कंपन्यांचा समावेश आहे. अमरावती रोड, आर्णी रोड, वणी रोड, नागपूर रोड, दिग्रस रोड यांसारख्या प्रमुख मार्गांवरील पेट्रोल पंप शहरातील वाहतुकीसाठी महत्त्वाचे मानले जातात. मात्र सध्याच्या परिस्थितीत या मार्गांवरील अनेक पंप बंद किंवा मर्यादित पुरवठा करत असल्याचे दिसून येत आहे.

तसेच शहरातील ७ ते १० गॅस एजन्सींमार्फत इंडेन, एचपी गॅस व भारत गॅसचे सिलेंडर वितरित केले जात असले तरी नागरिकांना वेळेवर गॅस मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. प्रशासनाकडून पुरेसा साठा असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

इंधन व गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी तात्काळ ठोस नियोजन जाहीर करावे, सर्व पेट्रोल पंप सुरू राहतील याची खात्री करावी, तसेच दररोजचा टँकर व सिलेंडर पुरवठा पारदर्शकपणे जाहीर करावा, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली. या वेळी शहर काँग्रेस अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, वैशाली सवाई, प्रमुख बगाडे, साधना शंभरकर, प्रा. पंढरी पाठे, कृष्णा पुसनाके यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# आपटी घाटावर नियमांना हरताळ; यंत्रसामग्री, बोटींचा सर्रास वापर

प्रतिनिधी २८ मार्च

**राळेगाव, मारेगाव** : तालुक्यातील आपटी रेती घाटाचा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत लिलाव झाला असला, तरी प्रत्यक्षात घाटावर अवैध उत्खननाचा मोठा प्रकार सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. लिलावातील अटींचे उल्लंघन करत नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर रेती उपसा होत असून, प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

नियमानुसार मजुरांच्या सहाय्याने मर्यादित उत्खनन करण्याची अट असताना, घाटावर बोटींच्या सहाय्याने नदीच्या खोल भागातून रेती काढली जात आहे. तसेच पोकलेन व जेसीबीसारख्या यंत्रसामग्रीचा वापर करून हायवा वाहनांमध्ये रेती भरली जात असल्याचे निदर्शनास येत आहे. हा प्रकार दिवस-रात्र सुरू असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे.

दरम्यान, या घाटाचा लाभ स्थानिक घरकुल लाभार्थ्यांना मिळण्याऐवजी परजिल्ह्यातील वाहनधारकांकडून मोठ्या प्रमाणावर रेती वाहतूक केली जात असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शासनाने निश्चित केलेल्या वेळेच्या मर्यादेचेही उल्लंघन होत असून, रात्रीच्या वेळीही मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू आहे. ओव्हरलोड वाहनांमुळे आपटी गावासह परिसरातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून, धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे.



या प्रकरणाची सखोल चौकशी करून लिलावातील अटींचा भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित घाटाचा परवाना रद्द करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. वरिष्ठ पातळीवर या प्रकरणाची दखल घेतली जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची दखल घेऊन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हस्तक्षेप करावा व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# खेड येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



प्रतिनिधी २८ मार्च

**आर्णी** : खेड येथील जि. प. उ. प्रा. म. डिजिटल शाळेत विद्यार्थ्यांच्या गुणवंत कामगिरीचा गौरव करण्यासाठी विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राजेश आडे व नीता आडे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व परीक्षेसाठी लेखन पॅड देऊन गौरविण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि.२८ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## वातावरणातील बदलामुळे प्रकृतीच्या तक्रारी

**अकोला:** गेल्या काही दिवसांपासून वातावरणातील बदल जाणवत आहे. तापमान ४१ अंश सेल्सिअस आहे. परंतु मध्येच ढगाळ वातावरण तयार होते. सारखा बदल प्रकृतीच्या कुरबुरी वाढवत आहे. ३०, ३१ मार्च दरम्यान काही ठिकाणी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. संमिश्र वातावरणाचा परिणाम जन जीवनावर झालेला दिसत आहे.



## अकोला शहरात तापमानाचे चांगलेच चटके

### चार दिवसांत 5.9 अंश सेल्सिअस तापमान वाढले

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला:** शहर आणि जिल्ह्यात पुन्हा एकदा सूर्याने आग ओकायला सुरुवात केली असून तापमान झपाट्याने वर चढत आहे. गेल्या चार दिवसांत कमाल तापमानात ५.९ अंश सेल्सिअसची वाढ झाली असून, यामुळे अकोलावासियांना वाढता उकाडा आणि उष्णतेचा सामना करावा लागत आहे.

अकोला शहर पुन्हा तापू लागले असून रामनवमीच्या दिवशी ४१.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि ढगाळ वातावरणामुळे किमान आणि कमाल तापमानात घट झाली होती. त्यावेळी कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले होते. मात्र, गेल्या चार दिवसांपासून पुन्हा एकदा उन्हाळ्याची दाहकता जाणवू लागली आहे. जिल्ह्यात तापमानाचा पारा वेगाने वाढत आहे.मार्च महिन्यात अकोल्यात कडक ऊन असते, मात्र अवकाळी पावसामुळे काही दिवस दिलासा मिळाला होता. आता पुन्हा प्रखर ऊन तापू लागले आहे.

# मनपाला प्राप्त झालेल्या 3 स्विपींग मशीनचे लोकार्पण





प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला.** शहरामधील धुळीवर नियंत्रण आणण्यासाठी आणि मुख्य रस्त्यांवरील सफाईचे काम चांगल्याप्रकारे व्हावे याकरिता मागणीनुसार राज्य शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अकोला महानगरपालिकेला ३ मॅकेनिकल स्वीपींग मशीन प्राप्त झाले असून २७ रोजी वाहनांचा, महापौर सौ.शारदा रणजीत खेडकर, मनपा आयुक्त डॉ.सुनील लहाने, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, उपमहापौर अमोल गोगे, सभागृहनेता पवन महल्ले यांच्या हस्ते झाला.

उच्च दाब सक्शन सिस्टीम आणि ब्रशेसच्या साहाय्याने जमिनीवरील घाण उचलून डक्टमधून आत खेचली जाते. धूळ पुन्हा पर्यावरणात परत जाण्यापासून रोखण्यासाठी योग्य धूळ नियंत्रण प्रणाली दिलेली आहे. सहाय्यक इंजिन हे हेवी ड्युटी डिझेलवर चालणारे असून, त्यात ब्लोअर फिरवण्यासाठी आणि युनिटच्या विविध हायड्रॉलिक सिस्टीम्स चालवण्यासाठी पुरेशी शक्ती आहे. यावेळी महिला व बाल कल्याण सभापती सौ.आरती घोगलिया, मनपा उपायुक्त विजय पारतवार, नगरसेवक हरिष आलिमचंदानी, शरद तुरकर, सिध्दार्थ उपरवट, धनंजय धबाले, नितीन ताकवाले, राजेश्वर धोटे, अमोल मोहोकार, संतोष डोंगरे, नगरसेविका सौ.सुनिताताई अग्रवाल, सौ.उषाताई वीर्क, वैशालीताई शेळके, ॲड.कल्पना गोटफोडे, सौ.प्राची काकड, सौ.पुजा गावंडे, सौ.पल्लवी मोरे, सौ.निखिता देशमुख, श्रीमती माधुरी क्षीरसागर, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल डोईफोडे, मोटर वाहन विभाग प्रमुख, अनिल बिडवे, अभियंता शैलेश चोपडे यांचेसह भाजपा पदाधिकारी आणि मनपा अधिकारी कर्मचा-यांची उपस्थिती होती.

## पाणी पुरवठयाच्या दिवशी पाण्याचा अपव्यय

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला:** शहरात दररोज कुठल्यातरी भागात पाणी पुरवठा करण्यात येतो. यावेळी मोठया प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत असल्याचे दृश्य दिसून येते. अनेक नागरिक नळाच्या दिवशी आपली वाहने याच नळाच्या पाण्याने धुतात. तसेच अनेक नागरिक पाणी भरणे झाल्यानंतर पाण्याचा पाइप सर्व्हिस लाइनमध्ये सोडून देत आहे. आधीच धरणातील जलसाठ्यात कमालीची घट झाली असताना पाण्याचा असा अपव्यय होत असल्याने, याकडे संबंधितांनी लक्ष देण्याची मागणी सुज्ञ नागरिकांमधून होत आहे.

## अंगणवाडी सेविकेच्या लेकीची पोलिस दलात निवड



प्रतिनिधी २८ मार्च

**अडगांव बु.:** छत्रपती शिवाजी नगर येथील दीपाली विलास खुमकर हिने महाराष्ट्र पोलीस दलात अमरावतीत स्थान मिळवले आहे. अंगणवाडी सेविकेच्या मुलीने मिळवलेल्या या यशाचे गावात कौतुक होत आहे.

सामान्य परिस्थितीतून मार्ग काढत, पोलिस भरतीसाठी लागणारे शारीरिक कष्ट आणि अभ्यासातील सातत्य यामुळे तिची निवड झाली आहे.

अडगाव पत्रकार संघाने तिचा शाल व फुल गुच्छ देवुन तिचा सत्कार केला. यावेळी अडगाव पत्रकार संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम निमकर्डे, उपाध्यक्ष विठ्ठल बागडी, सचिव दिपक रेळे,माणीक घाटे,नरेंद्र देशमुख, अ.शरिफ उपस्थित होते.

## रेल्वे स्टेशन परिसरात 11 किलो गांजा हस्तगत

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला :** रामदासपेठ पोलिसांच्या पथकाने अकोला रेल्वे स्टेशन परिसरात तस्करांना सापळ्यात अडकवून ११.८३५ किलो गांजा जप्त केला आहे. या कारवाईत बुलढाणा जिल्ह्यातील तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

तीन इसम दोन बॅगमध्ये गांजा घेऊन येत आहेत. अशा माहितीवरून पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे

व गुन्हे शोध पथकाने अकोला रेल्वे स्टेशन चौकात सापळा रचला. या कारवाईत बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव येथील गौरव विजय इंगळे (२१), राहुल बाळासाहेब देशमुख (२२) आणि देवानंद गजानन



शेळके (२३) या आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींकडून ११.८३५ किलो गांजा, दोन मोबाइल फोन असा एकूण ३ लाख २१ हजार ८७५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी पोलीस स्टेशन रामदासपेठ येथे कलम ८ (क), २० (ब) एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सुरू आहे. पोलिस उपनिरीक्षक नीलेश गायकवाड, प्रदीप जोगदंड, पोहवा दादाराव टापरे, श्याम मोहळे, अनिल धनभर, अभिजित इंगळे, प्रेम नांदोकार, अंकित कमलाकर, माधुरी लाहोळे, कावेरी ढाकणे तसेच अमरावतीचे विजय ठाकूर यांनी केली.

### पणजला शेतातील गोठ्याला लागलेल्या आगीत

## गो-ह्याचा भाजून मृत्यू



प्रतिनिधी २८ मार्च

**अकोट :** पणज येथील महालक्ष्मी माता मंदिर परिसरातील प्रशांत राऊत यांच्या वाघोडा शेत शिवारातील गट नंबर ७९ मधील शेतात असलेल्या गोठ्याला बुधवारी ४ वाजताच्या दरम्यान शॉर्ट सर्किट मुळे लागलेल्या आगीत गोठ्यातील चारा व आत मध्ये असलेल्या एका गो-ह्याचा मृत्यू झाला. याच शेतातील बाकी जनावरे चरण्यासाठी गेले असल्याने ते यातून बचावले बुधवारी महालक्ष्मी माता मंदिर येथे भंडारा होता त्यामुळे या ठिकाणी भावीक येथे हजर होते बाजूलाच अचानक आग लागली ते त्यांना दिसताच आग विझवण्यासाठी प्रयत्न केला व आग आटोक्यात आणली.

पंचनामा पटवारी राजेंद्र चरावंडे यांनी केला असून एम सी ई बी चे सागर जायले व शिवा वाघमारे यांनी ही घटनास्थळी भेट दिली शेतकऱ्याला आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी होतं आहे.

# कुटुंबियांनीच पाठवले काकांना यमसदनी

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला:** मूर्तिजापूर तालुक्यातील माना पोलीस स्टेशन अंतर्गत ग्राम वाई येथे घरगुती वादातून वहिनी व पुतण्यानेच गळा आवळून खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले. दोघांना अटक करण्यात आली आहे. घडलेल्या खून प्रकरणाचा काही तासांतच उलगडा करण्यात माना पोलिसांना यश आले. याप्रकरणी दोन्ही आरोपींना न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गोपाल रामकृष्ण भटकर वय ४७, रा. वाई माना, ह.मु. शिवाजीनगर, मूर्तिजापूर यांनी २६ मार्च रोजी माना पोलीस



ठाण्यात तक्रार दिली. सकाळी ९.४० वाजता त्यांना पुतण्या स्वप्नील याने फोन करून संजय काका मरण पावले असे सांगितले. त्यानंतर ते वाई माना येथे गेले असता संजय रामकृष्ण भटकर (वय ५०) हे घरामागील गोठ्यात मृतावस्थेत आढळले. या प्रकरणी सुरुवातीला आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करून पोलीसांनी तपास सुरू केला होता. मृतदेहाचा पंचनामा करून लक्ष्मीबाई देशमुख रुग्णालय, मूर्तिजापूर येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. प्राप्त ॲडव्हान्स पोस्टमार्टम अहवालात 'गळा आवळल्यामुळे श्वास गुदमरून मृत्यू' झाल्याचे स्पष्ट झाले. यानंतर अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासाची चक्रे वेगाने फिरवत असताना पोलिसांना माहिती मिळाली की, मृतक संजय भटकर यांचा खून घरगुती वादातूनच झाला आहे. त्यानुसार पोलिसांनी संशयित संगीता विनोद भटकर (४८) व स्वप्नील विनोद भटकर(२५)यांना ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. दोघांनी मिळून मारहाण करून गळा आवळून खून केल्याचे त्यांनी सांगितले. या दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली.

पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार गणेश नावकर, उपनिरीक्षक महाजन, पोहेकॉ संदीप सरोदे, पो.कॉ. जावेद खान, मंगेश पवार, महिला पोलीस कॉन्स्टेबल जयश्री मेंढे आदींनी कारवाई केली.

## शहरात विविध भागात कचऱ्याचे ढीग

### ♦ महापालिका आरोग्य विभागाला जाग येईल का

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला :** शहरात स्वच्छता अभियान अयशस्वी ठरत आहे. त्यामुळे कचऱ्याची समस्या गंभीर बनली आहे. बसस्थानकातील कचरापेट्या कचऱ्याने भरलेल्या असतात. तसेच विविध भागात कचरा साचला आहे. वेळीच उचल होत नसल्याने दुर्गंधी पसरत आहे. प्रवाशांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. स्वच्छता अभियानासोबतच कचरा पेट्यांची नियमित साफसफाई व कचऱ्याची वेळेवर विल्हेवाट लावणे अत्यावश्यक असल्याची



मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. प्रवाशांनी या समस्येकडे लक्ष वेधत संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, कचरापेट्या त्वरित रिकाम्या करून त्यांची स्वच्छता करावी, तसेच इतरत्र पसरलेला कचरा वेळीच उचलला जावा अशी मागणी होत आहे. शहरातील अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याशी चाललेला खेळ त्वरित थांबवावा अशी मागणी केली जात आहे.

## ट्रॅफिक जॅम मध्ये रुग्णवाहिका अडकली रूग्णांच्या जीवाशी खेळ



प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला.** अकोट फाईल परिसरात ट्रॅफिक जॅम लागणे नवीन गोष्ट नाही. परंतु यामुळे एखाद्या अत्यवस्थ रूग्णाचा बळी जाणार नाही. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शनिवारी सकाळी वाहनांच्या गर्दीत एक रुग्णवाहिका अडकली. वाहतूक शिपाई तेथे नसल्याने सायरनचा काहीही उपयोग झाला नाही.

ब-याच वेळाने रुग्णवाहिका पुढे जाऊ शकली. रुग्णवाहिकेला आधी मार्ग मोकळा करून देणे बंधनकारक आहे. कारण एकाच्या जीवन मरणाचा प्रश्न असतो. परंतु विस्कळीत रहदारीमुळे रुग्णवाहिका देखील लवकर निघू शकत नाही. ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. अकोट फाईल पुलावर रहदारीमुळे अनेक समस्या निर्माण होतात. घाईच्या वेळी घालमेल सहन करावी लागते. या भागातील समस्या दूर करण्यासाठी उपाय योजना करावी, अशी मागणी आहे.

## गॅस एजन्सीकडून नियमबाह्य सिलेंडर वितरणाचा प्रकार उघड

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला.** गॅस एजन्सीकडून नियम धाब्यावर बसवून सिलेंडर वितरण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ठरलेल्या क्षेत्राबाहेर जाऊन ग्राहकांना दुसऱ्या ठिकाणी बोलावून सिलेंडर दिले जात असल्याचे उघड झाले असून, काही ऑटो चालकांनाही मोठ्या पैशांत सिलेंडर पुरवठा केला जात असल्याची चर्चा आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित गॅस एजन्सी आपल्या अधिकृत कार्यक्षेत्राबाहेर जाऊन सिलेंडरचे वितरण करत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नियमांनुसार घरपोच सेवा देणे अपेक्षित असताना, ग्राहकांना वेगळ्या ठिकाणी बोलावून सिलेंडर देण्यात येत आहेत.या प्रकारात काही ऑटो चालकांनाही सिलेंडर देण्यात येत असल्याची माहिती समोर आली

## अखेर वानराला केले जेरबंद



प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला.** वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात हैदोस घालणारे वानर जेरबंद झाले. जिल्हा परिषद कॉलनी खडकी येथे वानर अनेक दिवसा पासून खाण्यास मिळावे म्हणून लहान मुलांच्या जवळ येत होते. त्यामुळे मुले घाबरून पळुन जात.

इथे मंदिर व आवार असल्यामुळे आईवडील व लहान मुले येतात. अनेक दिवसांपासून नागरिक भयभीत होते. नागरिकांना याचा त्रास रोज होता व धोकाही होता. त्यामुळे पकडणे आवश्यक होते. सहायक वनसंरक्षक नम्रता टाले यांच्या सुचनेवरून व आर एफ ओ विश्वास थोरात व वनपाल गजानन गायकवाड यांच्या मार्गदर्शनात वनरक्षक संघपाल तायडे, मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणे, चालक यशपाल इंगोले, प्रवीण पवार, प्रदीप खडे, तुषार आवारे , आलासिंह राठोड या वनविभाग टीम ने संपूर्ण जवाबदारी पार पाडली.

## महिलेचे अश्लील फोटो सोशल मीडियावर टाकणाऱ्या आरोपीला अटक

### खदान पोलिसांनी महिलेच्या तक्रारी वरून केली कारवाई

प्रतिनिधी २८ मार्च

**अकोला:** सोशल मीडियाचा गैरवापर करून एका महिलेचे अश्लील व आक्षेपार्ह फोटो पाठवल्या प्रकरणी आणि फोनवरून लज्जास्पद संभाषण केल्याप्रकरणी खदान पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली असून तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २६ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६:३० वाजेच्या सुमारास सिंधी कॅम्प ते अशोकवाटिका रोड परिसरात ही घटना घडली. पीडित फिर्यादी



महिलेच्या मोबाईल क्रमांकावर आरोपीने संपर्क साधून तिच्याशी अश्लील संभाषण केले. 'तू खूप छान दिसतेस, मला तुला भेटायचे आहे,' असे म्हणून तिची छेड काढली.

संबंधित मोबाईल क्रमांक धारकाने इन्स्टाग्राम आयडीवर फिर्यादीचे अश्लील व आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले. आपली बदनामी होत असल्याचे लक्षात येताच फिर्यादीने खदान पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. पोलिसांनी तांत्रिक बाबींचा आधार घेत आरोपीचा शोध लावला आणि त्याला अटक केली आहे. गुन्ह्यासाठी वापरलेला मोबाईल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी सखोल तपास करीत आहोत असे केदारे यांनी सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK